पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०६

**सभावृत्तांत**

**दिनांक – २६/०२/२०२१** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२६/०२/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा.अश्विनी संतोष जाधव
३. मा.अपर्णा निलेश डोके
४. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.खोत- उप आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे- क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) सेक्टर २६ प्राधिकरण निगडी येथील दोन लॉन टेनिस कोर्ट चालविणेस मिळणेबाबत- मा.अश्विनी जाधव, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) पंडीत दिनदयाळ उपाध्याय क्रीडा संकुल शनि मंदिर पुर्णानगर येथील लॉनटेनिस कोर्ट चालविण्यास देणेबाबत.- मा.अश्विनी जाधव, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) ओपन जिम साहित्य खरेदी करणेबाबत.-मा.रेखा दर्शले, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पुनावळे गावठाण व्यायामशाळा चालविणेस देणेबाबत.-मा.रेखा दर्शले, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) सेक्टर क्र.२५ मधील सावित्रीबाई फुले व्यायामशाळा रिकाम्या हॉलमध्ये सुरु करणेबाबत.- मा.अश्विनी जाधव, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

----------------

अ) दिनांक २८/१२/२०२०,०८/०१/२०२१ व २२/०१/२०२१ रोजी झालेल्या(कार्यपत्रिका क्रमांक ०३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०८/०१/२०२१ व २२/०१/२०२१ रोजी झालेल्या(कार्यपत्रिका क्रमांक ०४) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक २८/०१/२०२१ रोजी झालेल्या(कार्यपत्रिका क्रमांक ०५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक – ०१
दिनांक – २६/०२/२०२१ विभाग - क्रीडा
सुचक – मा.रेखा दर्शले अनुमोदक – मा.अश्विनी जाधव
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२९७/२०२० दि.२४/१२/२०२०

मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

म.न.पा.च्या भोसरी जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाजाची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात आल्याने, अल्प मुदतीची ई निविदा नोटीस क्र.२/२०१५-१६, भोसरी जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या दुस-या वर्षाचे दरमहा र.रु.१,३४,७५०/- दरानुसार मे. सुमित स्पोर्ट्स अँन्ड फिटनेस इक्विपमेंट्स, चिंचवड यांना भोसरी जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाज मुदतवाढ दि.१/१/२०१९ ते म.न.पा.चे सर्व जलतरण तलाव भाडे कराराने चालविण्यास देणेकामीची ई-निविदा प्रक्रिया होईपर्यंत देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक – ०२
दिनांक – २६/०२/२०२१
सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.रेखा दर्शले
संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

Majoj Kusalkar Tennis Academy सेक्टर नं.२४ चैतन्य श्री.हौ.सोसायटी प्राधिकरण निगडी,पुणे ४४ ही लॉन टेनिस खेळाचे प्रशिक्षण देणारी नामवंत संस्था असून, या संस्थेकडील खेळाडूंनी A.I.T.A आणि जिल्हा परिषद यांचेकडील राष्ट्रीय व राज्य स्तरावरील स्पर्धेमध्ये भाग घेऊन यश संपादन केले आहे. या संस्थेस खेळाडूंच्या लॉन टेनिस खेळाच्या सरावासाठी सेक्टर २६,प्राधिकरण निगडी येथील लॉन टेनिस मनपाच्या अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्याची या ठरावान्वये विनंती आहे. या संस्थेकडे A.I.T.A सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केलेले प्रशिक्षक आहेत. तसेच फिटनेस कोट व कन्सल्टंट त्यामुळे शहरातील खेळाडूंना लॉन टेनिसच योग्य प्रशिक्षण देण्यात येईल. या संस्थेकडून उद्योन्मुख खेळाडू घडविण्यासाठी लॉन टेनिस क्लब विकसीत करण्याची योजना आहे. तसेच खालीलप्रमाणे संस्थेच्या वतीने विद्यार्थी व नागरीकांकडून शुल्क आकारले जाईल.

| Category | Beginner | Advance |
|---|---|---|
| Student | 1000/- | 2000/- |
| PCMC School Student | 100/- | 200/- |
| PCMC Employee | 100/- | 200/- |

तरी Majoj Kusalkar Tennis Academy या संस्थेस सेक्टर नं २६ प्राधिकरण निगडी, येथील २ लॉन टेनिस कोर्ट तीन वर्षाकरिता मनपाच्या अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देणेस मान्यतादेणेकामी

मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २६/०२/२०२१

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.रेखा दर्शले

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शनिमंदर,पुर्णानगर येथे पंडीत दिनदयाळ उपाध्याय क्रीडा संकुल हे अद्ययावतपणे विकसित करणेत आलेले आहे. या क्रीडा संकुलामध्ये आधुनिक व उत्तम पध्दतीचा लॉन टेनिस कोर्ट तयार करणेत आलेला आहे. या ठिकाणी परिसरातील बरेचशे खेळाडू लॉन टेनिस खेळण्यासाठी येत असतात परंतु या खेळाडूंना मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षक उपलब्ध नाही. यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील श्री.रमाकांत चौतमहल यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील ऑल इंडीया टेनिस असोसिएशन मार्फत दिले जाणारे प्रशिक्षकाचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी मुंबई येथील सिध्दी सोसायटी येथे पाच वर्ष व मंगलोर मधील कॅनरा टेनिस अकॅडमी येथे पाच वर्ष खेळाडूंना लॉन टेनिसच प्रशिक्षण दिलेले आहे. ते पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्याय असल्याने त्यांनी पंडीत दिनदयाळ उपाध्याय क्रीडा संकुल येथील लॉन टेनिस कोर्ट चालविणेस मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री.रमाकांत चौतमहल यांचा लॉन टेनिस खेळाडूंना दिलेला प्रशिक्षणाचा अनुभव विचारात घेता त्यांना पंडीत दिनदयाळ उपाध्याय क्रीडा संकुल,शनिमंदिर , पूर्णानगर येथील लॉन टेनिस कोर्ट चालविण्यास दिल्यास त्याचा महापालिका क्षेत्रातील खेळाडूंना निश्चित फायदा होईल व येथील खेळाडू राज्य व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचण्यास मदत होईल. सबब पंडीत दिनदयाळ उपाध्याय क्रीडा संकुल, शनिमंदिर,पुर्णानगर येथील लॉन टेनिस कोर्ट मनपाच्या नियम अटी व शर्तीनुसार श्री.रमकांत चौतमहल यांना चालविणेस देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २६/०२/२०२१

सुचक – मा.रेखा दर्शले अनुमोदक – मा.अश्विनी जाधव

संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३१ महात्मा ज्योतिबा फुले उड्डान पुल खाली, सांगवी फाटा व साई चौक वॉकिंग ट्रॅक ,नवी सांगवी येथे आपेन जिम साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २६/०२/२०२१

सुचक – मा.रेखा दर्शले अनुमोदक – मा.अश्विनी जाधव

संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

पुनावळे गावठाण व्यायामशाळा ही किर्तीरत्न सेवा संघ किर्तीरत्न नगर पुनावळे या संस्थेस ११ महिने सवा शुल्क तत्वावर करााराने र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून घेवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक – ०६

दिनांक – २६/०२/२०२१

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.रेखा दर्शले

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

सेक्टर क.२५ मधील सावित्रीबाई फुले व्यायामशाळा येथील पहिल्या मजल्यावरील रिकाम्या हॉलमध्ये महिलांसाठी व्यायामशाळा सुरु करुन ती व्यायामशाळा ओम साई महिला मंडळ सेक्टर नं.२८ निगडी ४४ या संस्थेस ११ महिने सेवा शुल्क तत्वावर करााराने र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून घेवुन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **उत्तम प्रकाश केंदळे** )

**सभापती**


मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय



क्रमांक : नस/४/कावि/४२/२०२१

दिनांक : ०१/०३/२०२१

(उल्हास बबनराव जगताप)

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.